www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No. **B**
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

# Paper-II
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

(Name) ...............................................

2. (Signature) .........................................

(Name) ...............................................

Seat No. | | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## MAR - 01223

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **20** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   - (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

MAR - 01223/II—B

# Marathi
## Paper II
# मराठी
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. धार्मिक वाङ्मयाकडे लोकांचा ओढा वाढला आहे, कारण :

   (A) सुलभ व अद्ययावत मुद्रणव्यवस्थेमुळे

   (B) अर्थव्यवहार सुलभ झाल्यामुळे

   (C) लोकमानसातील तथाकथित धर्मभावनेची वाढ झाल्यामुळे

   (D) शिक्षणसंस्थांच्या वाढत्या प्रसारामुळे

2. कोणतीही चळवळ दीर्घकाळ टिकून राहायची असेल तर आवश्यक असणारा महत्त्वाचा घटक कोणता ?

   (A) आर्थिक स्थैर्य

   (B) वैचारिक भूमिका मांडणारे मुखपत्र

   (C) जनतेचा पाठिंबा

   (D) संस्थेचे कार्यालय

3. केशवसुतांची पुढीलपैकी कोणती कविता सुनीत **नाही** ?

   (A) 'पण लक्ष्यात कोण घेतो ?' च्या कर्त्यास

   (B) मयूरासन आणि ताजमहाल

   (C) आम्ही कोण ?

   (D) चिरवियुक्ताचा उद्गार

4. विंदा करंदीकरांच्या सुनीतांनां त्यांनी कोणते नाव दिले ?

   (A) अभंग सुनीत

   (B) मुक्त सुनीत

   (C) आततायी सुनीत

   (D) विरूपिका

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



5. गुजराती आणि तमिळ साहित्यांतील कादंबरीच्या विकासामध्ये ज्यांच्या कादंबऱ्यांच्या भाषांतरांनी मोलाची भर घातली, असे मराठी कादंबरीकार कोण ?

(A) बाबा पदमनजी

(B) वि. स. खांडेकर

(C) हरी नारायण आपटे

(D) विभावरी शिरूरकर

6. मध्यमवर्गीय विधवांच्या परिस्थितींच्या दृष्टि-कोनातून हरी नारायण आपटे, शरच्चंद्र चट्टोपाध्याय आणि इंदिरा गोस्वामी यांच्या कादंबऱ्यांची तुलना केल्यास त्या तुलनेचा आधारतळ कोणता म्हणता येईल ?

(A) समान तत्त्वप्रणाली

(B) वाङ्मयीन सृजनाला कारणीभूत होणारी समान परिस्थिती

(C) समान प्रेरणास्थान

(D) प्रभाव

7. 'टोवर्ड्स ए लिटररी हिस्टरी ऑफ इंडिया' या ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) नगेंद्र

(B) शिशिरकुमार दास

(C) सुजित मुखर्जी

(D) निरंजन रे

8. "वाङ्मय प्रकाराभ्यास हा तौलनिक साहित्याचाच विषय आहे. त्याला सर्वसाधारण साहित्याच्या प्रमेयात समाविष्ट करणे म्हणजे शास्त्रच नाकारणे होय." असे मत कोणी मांडले ?

(A) शिशिरकुमार दास

(B) स्वपन मजुमदार

(C) अमिय देव

(D) नगेंद्र

9. 'भारतीय साहित्य' ही संज्ञा प्रथम कोणी वापरली ?

(A) रवींद्रनाथ ठाकूर यांनी

(B) पाश्चात्य भारतविद्या शास्त्राच्या अभ्यासकांनी

(C) सरोजिनी नायडू यांनी

(D) डॉ. नगेंद्र यांनी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



10. का. बा. मराठे यांच्या 'नावल आणि नाटक' या निबंधाला पुढीलपैकी कोणते विधान लागू पडते ?

(A) लोकसाहित्याचा आढावा

(B) भरताच्या नाट्यशास्त्रावर आधारित

(C) इंग्लिश कादंबरी व नाटक यांचा सूक्ष्म अभ्यास

(D) समकालीन कादंबऱ्या व नाटके यांचे विश्लेषण इंग्रजी संकल्पना वापरून

11. कादंबरीसदृश कथनात्मक रचनेंचा पुढीलपैकी कोणता गद्य वाङ्मयप्रकार लिखित भारतीय साहित्यात प्रचलित नव्हता ?

(A) रूपककथा

(B) गोष्ट

(C) किस्सा

(D) तात्पर्यकथा

12. मूळ साहित्यकृतीला न्याय देण्याच्या दृष्टीने भाषांतरकर्त्याकडून मूळ आशयापासून हेतुतः अपसरण घडते, त्याला काय नाव आहे ?

(A) सांस्कृतिक प्रभाव (Cultural influence)

(B) नवनिर्मिती (Creation)

(C) रूपांतर (Adaptation)

(D) मध्यस्थ भाषांतर (Interventionist translation)

13. 'लिखित साहित्याचा अभ्यास करताना लोकतत्त्वीय अध्ययनदृष्टीचा अंगीकार केल्यास लिखित साहित्याच्या आकलनाची एक वेगळी दिशा स्पष्ट होऊ शकते' असे मराठीत सर्वप्रथम कोणी सांगितले ?

(A) गंगाधर मोरजे

(B) शैला लोहिया

(C) रा. चिं. ढेरे

(D) प्रभाकर मांडे

14. 'दैवतकथेत ऐतिहासिक सत्य लपलेले असते.' ही भूमिका कोणत्या अभ्यास संप्रदायाची आहे ?

(A) निसर्गरूपवादी

(B) भ्रांतकल्पनावादी

(C) भाषाशास्त्रीय

(D) संप्रसारणवादी

15. 'मिथ्स, प्रिमिटिव्ह सायकॉलॉजी' हा ग्रंथ कोणाचा ?

(A) ॲलन डंडेस

(B) लेवी स्ट्रास

(C) अँटी अर्ने

(D) ब्रॉनिस्लो मॅलिनॉस्की

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



16. ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (*a*) | फोर आर्केटाइप्स | (1) | रॉबर्ट रेडफिल्ड |
| (*b*) | रीकरंट थीम्स इन मिथ अँड मिथमेकिंग | (2) | रॉबर्ट रेडफिल्ड |
| (*c*) | पिझंट सोयायटी अँड कल्चर | (3) | के. एम. चिडविक |
| (*d*) | द ग्रोथ ऑफ लिटरेचर | (4) | सी. जी. युंग |
| | | (5) | हेन्री मरे |

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (5) | (2) | (2) | (4) |
| (B) | (2) | (4) | (3) | (5) |
| (C) | (4) | (5) | (2) | (3) |
| (D) | (3) | (3) | (1) | (1) |

17. "दलित साहित्याचा प्रश्न हा या समाजाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीच्या प्रयत्नांपैकी एक प्रयत्न आहे." हे विधान कोणाचे आहे ?

(A) राजा ढाले

(B) नामदेव ढसाळ

(C) केशव मेश्राम

(D) रा. ग. जाधव

18. 'बन्याची दिंडी' या कादंबरीचे लेखक कोण आहेत ?

(A) शंकरराव खरात

(B) सुखराम हिवराळे

(C) केशव मेश्राम

(D) अमिताभ

19. 'दस्तखत' हा कवितासंग्रह कोणाचा आहे ?

(A) भीमसेन देठे

(B) प्रकाश जाधव

(C) बबन चहांदे

(D) मीना गजभिये

20. शेतकरी संघटनेच्या वैचारिकतेशी आणि कृति-शीलतेशी नाते असणारे लेखक कोण आहेत ?

(A) बाबा पाटील

(B) शंकर पाटील

(C) भास्कर चंदनशिव

(D) वासुदेव मुलाटे

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



21. ''बोलीच्या वापरातूनच अनुभव अधिक परिणाम-कारकतेने प्रकट होऊ शकतो म्हणून ग्रामीण लेखकांनी विविध बोलींचा अभ्यास करणे गरजेचे आहे.''

(A) पूर्ण विधान बरोबर

(B) पूर्ण विधान चूक

(C) फक्त पूर्वार्ध बरोबर

(D) फक्त उत्तरार्ध बरोबर

22. 'कांडी' ही कथा कोणाची आहे ?

(A) वासुदेव मुलाटे

(B) भास्कर चंदनशिव

(C) रा. रं. बोराडे

(D) उद्धव शेळके

23. वाङ्मयेतिहास लेखनाविषयीचा कोणता दृष्टिकोन विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात प्रचलित झालेला दिसत नाही ?

(A) लेखकानुसारी

(B) कालखंडानुसारी

(C) वाङ्मयप्रकारानुसारी

(D) वाचकप्रतिसादानुसारी

24. वाङ्मयेतिहासकाराला यथायोग्य अशी समीक्षा-दृष्टी असावीच लागते, मात्र समीक्षकांवर इतिहासाचा संदर्भ लक्षात घेणे बंधनकारक नसते.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

25. साहित्याचा इतिहास म्हणजे साहित्यातील रूप-बंधांच्या स्वायत्त विकासाचा इतिहास, अशी भूमिका कोणी मांडली ?

(A) रेने वेलेक

(B) आर. एस. क्रेन

(C) टी. एस. इलियट

(D) फ्रीड्रिख नीत्शे

26. इतिहास वाचण्यापूर्वी तो इतिहास लिहिणारा इतिहासकार वाचायला शिका, असे कोणी म्हटले ?

(A) हेगेल

(B) हिरॉडोटस

(C) इ. एच. कार

(D) शोपेन हॉर

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



27. ''महाराष्ट्र सात्त्विक : तेथचे जडचेतन पदार्थ तेही सात्त्विक : तेथ असतां कव्हणीची शरीर मानसिक उपद्रव नुपजति :''

हा महाराष्ट्राचा गौरव कोणी केला ?

(A) गोविंदप्रभू

(B) विश्वनाथबास बीडकर

(C) नागदेवाचार्य

(D) महदंबा

28. पुढील ग्रंथ कालानुक्रमे लिहा :

परमामृत, श्रीसमर्थप्रताप, नित्यानंदैक्यदीपिका, भावार्थरामायण

(A) श्रीसमर्थप्रताप, परमामृत, नित्यानंदैक्य-दीपिका, भावार्थरामायण

(B) भावार्थरामायण, परमामृत, नित्यानंदैक्य-दीपिका, श्रीसमर्थप्रताप

(C) परमामृत, भावार्थरामायण, नित्यानंदैक्य-दीपिका, श्रीसमर्थप्रताप,

(D) नित्यानंदैक्यदीपिका, परमामृत, श्रीसमर्थ-प्रताप, भावार्थरामायण

29. नसता कवीचा व्यापार। तरी कैंचा असता जगदुद्धार।

म्हणोनि कवि हे आधार। सकल सृष्टीसी॥

हा कविगौरव कोणी केला ?

(A) ज्ञानेश्वर

(B) नामदेव

(C) तुकाराम

(D) रामदास

30. आजिं सोनियाचा दिवस धन्य जाला। प्रत्यक्ष भेटला नामदेव।

माझें मज दिलें माझें मज दिलें। माझें मज दिलें प्रेमसुख।

हे धन्योद्गार कोणी काढले ?

(A) ज्ञानेश्वर

(B) चोखामेळा

(C) जनाबाई

(D) गोरा कुंभार

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



31. 'जसे भडभुंजे लाह्या भाजतात तशी गत केली', 'मुरगी मारी बचडे दाणादाण तैसे जिकडील तिकडे पळाले', 'तुपाचे घागरीवर उंदराचे पिटकुले बसते, तैसा प्रकार जाहाला' ही प्रासादिक, जोमदार, नाट्यपूर्ण भाषा कोणत्या बखरीतील आहे ?

(A) पेशवे बखर

(B) सभासदाची बखर

(C) भाऊसाहेबाची बखर

(D) सोनपत पानपत येथील मराठे दुराणी युद्ध

32. 'केशवसुत काव्य आणि कला' हे संपादन कोणी केले ?

(A) रा. शं. वाळिंबे

(B) वि. स. खांडेकर

(C) स. गं. मालशे

(D) गो. म. कुलकर्णी

33. पुढीलपैकी कोणती कादंबरी येशू ख्रिस्ताच्या जीवनावर आधारित आहे ?

(A) इहयात्रा

(B) अनाहत

(C) जेलबर्ड्स

(D) मन्वंतर

34. साक्षीदार, मेघमल्हार, बावनखणी, मदनाची मंजिरी ही नाटके कोणी लिहिली आहेत ?

(A) पु. भा. भावे

(B) विद्याधर गोखले

(C) बाळ कोल्हटकर

(D) पुरुषोत्तम दारव्हेकर

35. 'कवनाचा सागर' किंवा 'मोठमोठ्या राज्यामधी महशूर/जगजाहिर चारी तर्फा' हे गौरवपूर्ण वर्णन कोणत्या शाहीराचे आहे ?

(A) होनाजी बाळा

(B) प्रभाकर

(C) कविराय रामजोशी

(D) अनंत फंदी

36. पुढील आत्मचरित्रे प्रकाशनकालानुसार लिहा :

सफर, हरवलेले दिवस, मी एस. एम., आत्मकथा

(A) सफर, मी एस. एम., हरवलेले दिवस, आत्मकथा

(B) मी एस. एम., आत्मकथा, हरवलेले दिवस, सफर

(C) आत्मकथा, हरवलेले दिवस, सफर, मी एस. एम.

(D) हरवलेले दिवस, सफर, मी एस. एम., आत्मकथा

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



37. पुढीलपैकी कोणते चरित्र द. न. गोखले यांनी लिहिले नाही ?
    (A) क्रांतिवीर बाबाराव सावरकर
    (B) विराट ज्ञानी न्यायमूर्ती रानडे
    (C) डॉ. पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन
    (D) डॉ. केतकर

38. दलित आदिवासी ग्रामीण संयुक्त साहित्य महासभेचे प्रवक्ते कोण होते ?
    (A) नागनाथ अण्णा नायकवडी
    (B) शरद पाटील
    (C) आनंद यादव
    (D) विनायक तुमराम

39. ''दलित साहित्य चळवळीलाही राजकारणी परिमाण जरूर आहे, पण तिला एक अंगभूत जास्त खोली व व्याप्ती आहे'' हे विधान कोणाचे आहे ?
    (A) वसंत पळशीकर
    (B) गं. बा. सरदार
    (C) सदा कऱ्हाडे
    (D) गो. म. कुलकर्णी

40. दलित चळवळीचे सर्वाधिक महत्त्वाचे तत्त्व कोणते ?
    (A) स्वातंत्र्य
    (B) समता
    (C) बंधुता
    (D) मानवमुक्ती

41. पहिले आदिवासी साहित्य संमेलन कुठे पार पडले ?
    (A) चंद्रपूर
    (B) भद्रावती
    (C) ठाणे
    (D) यवतमाळ

42. 'आदिवासी वीर पुरुष' हे पुस्तक कोणी लिहिले आहे ?
    (A) एकनाथ साळवे
    (B) गोविंद गारे
    (C) बाबा भांड
    (D) अमरेंद्र

43. 'मनोगत' हा कविता संग्रह कोणाचा आहे ?
    (A) कुसुम आलाम
    (B) उषाकिरण आत्राम
    (C) रामचंद्र जंगले
    (D) माधव सरकुंडे

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



44. पुढीलपैकी कोणते अनियतकालिक होते ?

(A) परामर्श

(B) असो

(C) रसरंग

(D) आलोचना

45. पुढीलपैकी कोणते कवी-लेखक अनियतकालि-काच्या चळवळीत सक्रिय होते ?

(A) पु. शि. रेगे

(B) विजय तेंडुलकर

(C) किरण नगरकर

(D) भालचंद्र नेमाडे

46. 'ठणठणपाळ' हे टोपण नाव कोणत्या लेखकाचे आहे ?

(A) के. ज. पुरोहित

(B) जयवंत दळवी

(C) वसंत कानेटकर

(D) चि. त्र्यं. खानोलकर

47. 'सत्यकथा' नियतकालिक कधी बंद पडले ?

(A) सप्टेंबर 1982

(B) ऑक्टोबर 1982

(C) ऑगस्ट 1981

(D) सप्टेंबर 1981

48. 'सेंट्रल बस स्टेशन' या कादंबरीचे लेखक कोण ?

(A) व. वा. बोधे

(B) उत्तम बंडू तुपे

(C) महादेव मोरे

(D) वसंत नरहर फेणे

49. 'अ रूम ऑफ वन्सओन' ही संहिता कोणी लिहिली ?

(A) व्हर्जिनिया वुल्फ

(B) सान्ड्रा गिलबर्ट

(C) सिमान द बुव्हा

(D) केट मिलेट

50. ग्रामीण परिसरातील दलित जीवनाचे चित्रण करणारा 'मरणकळा' हा कथासंग्रह कोण ?

(A) सोपान हळमकर

(B) वामन होवाळ

(C) महावीर जोंधळे

(D) भास्कर चंदनशिव

www.prepp.in



51. दलितांच्या झोपड्या जाळल्याच्या प्रसंगावर आधारलेली डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची साहित्यकृती सांगा :

(A) सावित्रीचा निर्णय

(B) राजधानी

(C) मध्यरात्र

(D) गांधारीचे डोळे

52. 8 मार्च 1986 रोजी ग्रामीण साहित्य परिषदेची स्थापना कोठे झाली ?

(A) कोपरगाव

(B) औरंगाबाद

(C) पुणे

(D) वैजापूर

53. 'साहित्यमूल्य आणि अभिरुची' हा ग्रंथ कोणाचा आहे ?

(A) अरविंद वामन कुलकर्णी

(B) गो. मा. पवार

(C) गो. म. कुलकर्णी

(D) रा. ग. जाधव

54. साहित्यशास्त्रात 'काव्य' या संज्ञेची अर्थव्याप्ती कोणती आहे ?

(A) पद्यमय रचना

(B) विदग्ध साहित्य अथवा ललित साहित्य असे ज्याला म्हणतात ते सर्व

(C) नाटक

(D) कादंबरी

55. साहित्यशास्त्रात 'काव्य' या शब्दांची अर्थव्याप्ती कोणती ?

(A) विदग्ध अथवा ललित वाङ्मय असे ज्यास म्हणतात ते सर्व

(B) नाटक

(C) कादंबरी

(D) पद्य वाङ्मय

56. मम्मटाने सांगितलेल्या काव्यप्रयोजनांपैकी कोणत्या दोन प्रयोजनांबाबत समीक्षकांत वादंग निर्माण झाला ?

(A) यश व अर्थप्राप्ती

(B) व्यवहारज्ञान व शिवेतरक्षति

(C) सद्यः परनिर्वृत्ती व कान्तासम्मिततयोपदेश

(D) यश व शिवेतरक्षति

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



57. 'माझ्या गं दारावरनं, कोणा राजाचा हत्ती गेला' या गीतातील लक्ष्यार्थाचे प्रयोजन कोणते ?

(A) अंगांगीभाव

(B) आधाराधेय

(C) अतिनिकटत्व

(D) कार्यकारणभाव

58. ध्वनीचे तीन प्रकार कोणते ?

(A) संलक्ष्यक्रम ध्वनी, असंलक्ष्यक्रम ध्वनी, झटिति प्रत्यय

(B) वस्तुध्वनी, अलंकारध्वनी, रसादिध्वनी

(C) लौकिकध्वनी, अलौकिकध्वनी, वस्तुध्वनी

(D) प्रतीयमान ध्वनी, अप्रतीयमान ध्वनी, संलक्ष्यक्रम ध्वनी

59. ''मातीत ते पसरले अति रम्य पंख'' या ना. वा. टिळक यांच्या कवितेत कोणता रस आहे ?

(A) रौद्र

(B) बीभत्स

(C) करुण

(D) अद्‌भुत

60. 'खांदी कावडी पी सिताची। करी जोडी सुनियांची।
कांती झळके कटिवांची। मांश भेदिती॥'

'ऋद्धिपूर-माहात्म्य' या काव्यातील उपरोक्त पंक्ती कोणाचे वर्णन करतात ?

(A) श्रीचक्रधर स्वामी

(B) गोविंदप्रभू

(C) दत्तात्रेय

(D) नागदेवाचार्य

61. 'जीवप्रबोध' या ग्रंथाचा कर्ता कोण ?

(A) भानुदास

(B) शहादत्तप्रभू

(C) एकनाथ

(D) जनार्धनस्वामी

62. गुरुचरित्र हा ग्रंथ दत्त सांप्रदायिकांचा वेदग्रंथ मानला जातो. तो पुढील कोणी लिहिला आहे ?

(A) सरस्वती गंगाधर

(B) नृसिंह सरस्वती

(C) निरंजन रघुनाथ

(D) दासोपंत

www.prepp.in



63. राक्षस तागडीची बखर इ.स. 1542 मध्ये लिहिली असून, तिचा कर्ता वेंकटाद्री तकेल निसीदा हा आहे.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान बरोबर

64. 'साहित्यसमीक्षा ही व्यामिश्र स्वरूपाची एक प्रवाही प्रक्रिया असून तीत साहित्यकृतीचे वाचन, विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन व शब्दांकन ही प्रमुख अंगे सामावलेली असतात' ही व्याख्या कोणी केली आहे ?

(A) गंगाधर पाटील

(B) रा. भा. पाटणकर

(C) वा. ल. कुलकर्णी

(D) म. सु. पाटील

65. 'साहित्यिक ज्ञानक्षमते'ची (लिटररी कॉम्पीटन्स) संकल्पना कोणी मांडली आहे ?

(A) नोम चॉम्स्की

(B) फर्डिनांड द सोस्यूर

(C) जोनाथन कलर

(D) रोलां बार्थस

66. 'अनेक आवाजीपणा' ही संकल्पना कोणत्या साहित्यप्रकाराच्या संदर्भात योजलेली आहे ?

(A) दीर्घकथा

(B) कादंबरी

(C) नाटक

(D) दीर्घ कविता

67. 'आस्वादक समीक्षा पद्धती' चे अस्तित्व कोणी नाकाराले आहे ?

(A) गंगाधर गाडगीळ

(B) रा. ग. जाधव

(C) रा. भा. पाटणकर

(D) के. रं. शिरवाडकर

68. स्वप्नतंत्रातील संक्षेपप्रक्रिया पुढीलपैकी कोणत्या घटकावर आधारलेली असते ?

(A) साधर्म्य

(B) वैधर्म्य

(C) असंज्ञ मन

(D) अहम्

69. 'कथेतील निवेदकाला निवेदक, गर्भित लेखक व प्रत्यक्ष लेखक अशी तीन परिमाणे असतात.

(A) संपूर्ण विधान चुकीचे आहे

(B) संपूर्ण विधान बरोबर आहे

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक आहे

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर आहे

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



70. 'कथनात्म साहित्यकृती वाचकाबरोबर' सांगण्याचा करार करते' हे मत कोणी मांडले आहे ?

(A) गंगाधर पाटील

(B) विलास सारंग

(C) मिलिंद मालशे

(D) हरिश्चंद्र थोरात

71. 'महाकाव्य' व 'कादंबरी' यामध्ये कोणते महत्त्वपूर्ण साम्य असते ?

(A) कथनपरता

(B) आदर्शांचा गौरव

(C) सांकेतिकता

(D) व्यापक जीवनदर्शन

72. 'नाटक' (शोकान्तिका) ही व्यक्तीची अनुकृती नसून एका कर्माची व जीवनाची अनुकृती असते' हे विधान कोणी केले आहे ?

(A) प्लेटो

(B) हेन्री बर्गसाँ

(C) आय. ए. रिचर्डस्

(D) ॲरिस्टॉटल

73. 'आशयवाहक किंवा अर्थवाहक नादाकृती म्हणजे कविता' ही व्याख्या कोणी केलेली आहे ?

(A) टी. एस. इलिएट

(B) कोलरिज

(C) हर्बर्ट रीड

(D) जे. एस. मिल

74. 'रोजनिशी' हे लेखनतंत्र मराठीतील कोणत्या कादंबरीच्या निवेदन पद्धतीमध्ये संपूर्णत: योजलेले आहे ?

(A) पण लक्षात कोण घेतो !

(B) रणांगण

(C) लव्हाळी

(D) इंदू काळे आणि सरला भोळे

75. 'मुलगी झाली हो' या पथनाट्याची संहिता कोणी लिहिली आहे ?

(A) छाया दातार

(B) ज्योती म्हापसेकर

(C) मुक्ता मनोहर

(D) समर खडस

www.prepp.in



76. 'आयबू' ही व्यक्तिरेखा कोणत्या साहित्यकृतीत आढळते ?

(A) शोभायात्रा

(B) बनगरवाडी

(C) वळीव

(D) हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ

77. मानवी मनातील क्रौर्य आणि हिंसा यांचे प्रत्ययकारी दर्शन पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृतीत आढळते ?

(A) गिधाडे

(B) वळीव

(C) माणूस

(D) बनगरवाडी

78. "पडिली भुली धावते सैराट।
छंद गोविंदाचा चोजविते वाट।
मागे सांडोनी सकळ बोभाट।
वंदी पदांबुजे ठेऊनी ललाट वो॥
या गौळणीचा कर्ता कोण ?

(A) संत नामदेव

(B) संत एकनाथ

(C) संत ज्ञानेश्वर

(D) संत तुकाराम

79. 'कचाचे मिथक' कोणत्या साहित्यकृतीत योजले आहे ?

(A) कोण म्हणतंय टक्का दिला

(B) तुही यत्ता कंची

(C) भिजकी वही

(D) शोभायात्रा

80. वि. का. राजवाडे यांनी 'महाराष्ट्राचे सर टॉमस मोर' हे बिरुद कोणास बहाल केले आहे ?

(A) रामचंद्रपंत अमात्य

(B) म्हाइंभट

(C) कृष्णाजी अनंत सभासद

(D) म. फुले

81. सर्जनशीलता हा भाषेचा महत्त्वाचा गुणधर्म आहे; मात्र त्याचे विशेषत्वाने प्रत्यंतर साहित्या-विष्कारातून येते.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

www.prepp.in



82. मौखिक व लिखित साहित्यपरंपरांमध्ये वेगळेपणा आणणारा प्रमुख घटक पुढीलपैकी कोणता ?

(A) अनुभवाचे सार्वत्रिकीकरण

(B) भाषेचा शब्दसंग्रह

(C) लेखकाचे व्यक्तिमत्त्व

(D) रसिकाचे व्यक्तिमत्त्व

83. ज्या समासातील कोणतेही पद प्रधान नसून तो समास भिन्न अशा नामाचे विशेषण असतो, त्यास पुढीलपैकी कोणती संज्ञा आहे ?

(A) मध्यमपदलोपी

(B) बहुव्रीही

(C) द्वंद्व

(D) तत्पुरुष

84. 'तू कुसुमला पुस्तके दिलीस.'—या वाक्यातील प्रयोग कोणता ?

(A) कर्तरी

(B) कर्मणी

(C) कर्मभावसंकर

(D) कर्तृकर्मसंकर

85. 'आजोबांना आता जिने चढवत नाहीत.'—यातील अधोरेखित क्रियापद पुढीलपैकी कोणत्या प्रकारचे आहे ?

(A) शक्य

(B) प्रयोजक

(C) सिद्ध

(D) अकर्मक

86. पुढीलपैकी कोणता अलंकार उपमा अलंकारातून रचनाभेदाने उत्पन्न झालेला नाही ?

(A) उत्प्रेक्षा

(B) रूपक

(C) भ्रांतिमान

(D) श्लेष

87. भाषाकुलाची संकल्पना पुढीलपैकी कोणत्या अभ्यासकांच्या मांडणीमुळे पुढे आली ?

(A) फर्डिनंड द सोस्यूर

(B) विल्यम जोन्स

(C) ब्लूमफील्ड

(D) एडवर्ड सपीर

www.prepp.in



88. 'वहिवाट' या शब्दात किती स्वन आहेत ?
(A) सात
(B) आठ
(C) चार
(D) सहा

89. भाषाविज्ञानाच्या वर्णनात्मक अभ्यासाच्या पद्धती-मध्ये कशाचे वर्णन अपेक्षित असते ?
(A) भाषेतील ध्वनी व शब्दांचे
(B) विविध स्तरांवरील भाषिक संरचनेचे
(C) भाषेतील शब्दसंग्रहाचे
(D) भाषिक वर्तनाचे

90. प्रत्येक भाषक समाजाचे भाषाबाह्य सृष्टीचे ज्ञान त्या समाजाच्या भाषेने नियंत्रित केलेले असते, असा विचार कोणी मांडला आहे ?
(A) मॅलिनोव्हस्की व फर्थ
(B) सपीर आणि व्होर्फ
(C) यूल आणि बर्नेल
(D) बॅसिल बर्नस्टाईन

91. अहिराणी बोलीवर कोणत्या भाषेचा प्रभाव अधिक दिसतो ?
(A) हिंदी
(B) गुजराती
(C) पंजाबी
(D) कन्नड

92. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून पुढीलपैकी कोणी मराठीत साहित्यकृती निर्माण केली आहे ?
(A) अरुण कोलटकर
(B) कविता महाजन
(C) मेघना पेठे
(D) अतुल पेठे

93. 'भवाडा' हा बोहाडा या शब्दाचा अपभ्रंश असून, तो जव्हार वाडा, मोखाडा या आदिवासी बहूल भागात सादर होतो.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक
(D) उत्तरार्ध बरोबर पूर्वार्ध चूक

94. ठाणे येथील मराठी भाषेतील ग्रंथाचे संग्रहालय कोणाच्या प्रेरणेने स्थापन झाले ?
(A) दादोबा पांडुरंग
(B) न्यायमूर्ती रानडे
(C) गव्हर्नर जोनाथन डंकन
(D) वि. ल. भावे

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



95. 'गोरक्ष-अमरनाथ संवाद' या नावने नाथ संप्रदायात ओळखला जाणारा पण नंतर 'विवेकदर्पण' या नावाने प्रसिद्ध झालेला ग्रंथ कुणी संपादित केला आहे ?

(A) व. दा. कुलकर्णी

(B) व. दि. कुलकर्णी

(C) पां. ना. कुलकर्णी

(D) प्र. न. जोशी

96. मराठी भाषेतील पहिले बुकीश नाटक कोणते ?

(A) जयपाळ नाटक

(B) तृतीय रत्न

(C) स्वैरसकेशा

(D) थोरले माधवराव पेशवे

97. तत्कालीन सर्वसाधारण माणसांच्या अभिरुची ध्यानात घेऊन 'पांडवप्रताप' सारखी ग्रंथरचना करणारा कवी कोण ?

(A) वामन पंडित

(B) मोरोपंत

(C) श्रीधर

(D) सिद्धनागेश

98. पुढीलपैकी कोणते नियतकालिक साहित्य महामंडळाच्या घटकसंस्थेकडून चालविले जाते ?

(A) नवाक्षरदर्शन

(B) अक्षर

(C) प्रतिष्ठान

(D) अक्षरवाङ्मय

99. 'जलशाकरिता कविता संग्रह' हे पुस्तक कोणाचे आहे ?

(A) केशवराव विचारे

(B) रामनाथ चव्हाण

(C) हरिभाऊ चव्हाण

(D) रा. ना. चव्हाण

100. "साहू नका कोणाचा जुलूम
होऊ नका कुणाचे गुलाम
सोडून घारे सारे बदकाम"
हा संदेश कोणी दिला ?

(A) शिवराम जानबा कांबळे

(B) हरिभाऊ तोरणे

(C) गोपाळबाबा वलंगकर

(D) किसन फागूजी बनसोडे

www.prepp.in



## ROUGH WORK

Your Personal Exam Guide